International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# आदिवासी वारली समाज – जंगल व पर्यावरण

**प्रा.सौ. हेमलता यु. मुकणे**
इतिहास विभाग, अस्टिस्टंट प्रोफेसर, श्री. एम. डी. शाह महिला महाविद्यालय
*Corresponding Author*- **प्रा.सौ. हेमलता यु. मुकणे**
Email- ghema.mukane@gmail.com

**सारांश**
भारतासारख्या खंडप्राय देशात जगातल्या सर्व प्रकारच्या गोष्टी थोडयाफार प्रमाणात भारतीय समाजात दिसून येतात. त्यामुळे भारताला जगाची छोटी प्रतिकृती असे म्हटले जाते. आपला देश अनेक घटक राज्य, अनेक केंद्रशासीत प्रदेश मिळून एक संघराज्य बनला आहे. या देशात फार प्राचीन काळापासून आदिवासी जमातीची मूळ वस्तीस्थान आहेत. देशाच्या उत्तर व पूर्व भागात आंध्रप्रदेश बिहार, झारखंड, गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, ओरीसा, राजस्थान आणि महाराष्ट्र या राज्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी लोक राहतात. भारतात ४२७ आदिवासी जमाती वसलेल्या आहेत. भारतातील अनेक राज्यातील महाराष्ट्र एक अग्रेसर राज्य आहे. शरीर सौंदयांत जसे नाकाला महत्त्वपूर्ण स्थान आहे तसेच महाराष्ट्र राज्यालाही आहे. निसर्गाची कृपा सर्वच भूप्रदेशाला लाभते असे नाही. मात्र ज्या भूभागाला ती लाभेल तो निसर्ग सौंदयाने श्रीमंत होतो. अशी श्रीमंती महाराष्ट्राला लाभली आहे. अशा या राज्यातील 'पालघर' या जिल्हयाची १ ऑगस्ट २०१४ रोजी आदिवासी जिल्हा म्हणून निर्मिती झाली. या नविन जिल्ह्यातील 'तलासरी' हा महत्त्वपूर्ण आदिवासी तालुका आहे. या तालुक्यात अनेक आदिवासी जमाती आहेत व त्यातील प्रमुख 'वारली' जमात होय. इ.स. २०११ च्या जनगणनेनुसार ८८.५८ टक्के इतके प्रमाण या जमातीचे आहे. २१व्या शतकातही हा समाज बराच मागासलेला आहे. तरीसुद्धा जीवनाचा प्रत्येक क्षण हा आनंदाभिमुख व्हावा यासाठी तो प्रयत्नशील असतो. सांस्कृतिक मुल्यांची आपली परंपरा जपून जीवन जगणारा हा समाज आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागासलेल्या आहे. स्वातंत्र्याचे अनाकलन व मूलभूत हक्काच्या जाणिवेविषयी जागृती नव्हती. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये तर या भागातील हा समाज वेठबिगार, जमिनदार, सावकार, धनाढ्य व्यापारांच्या दावणीला गुराढोरांप्रमाणे बांधला गेला होता. मुकी जनावरे पाळावीत व हाकावित, त्याचप्रमाणे त्यांचे जीवन होते. त्यांच्यावर होणारा अन्याय व अत्याचाराविरोधात वाचा फोडण्याचे काम डॉ. शामराव परुळेकर व गोदावरी परुळेकर यांनी केले.

**प्रस्तावना**

आदिवासींच्या वसतीस्थानावर तेथील पर्यावरणाचा इतका प्रभाव पडलेला असतो, ते त्याच्याशी एकजीव झालेले असतात, पण जेव्हा त्याचे विस्थापन होते तेव्हा अनेक चांगल्या वाईट परिणामांना त्यांना तोंड द्यावे लागते. अनेक ताण-तणाव त्यांच्या जीवनात निर्माण होतात. भारतात "जिथे आदिवासी तेथे जंगल व जंगल तेथे आदिवासी" अशी परिस्थिती आहे. जंगलाशिवाय हा समाज सुखी आणि समाधानी राहू शकत नाही. जंगल हे त्यांचे सर्वस्व आहे. जंगलविषयक कायदे अंमलात आल्यानंतर मात्र आदिवासींच्या मोकळया व स्वतंत्र वृत्तीवर अनेक बंधने आली व त्यामुळे त्यांची सामाजिक व आर्थिक कुंचबणा झाली . सन १८९४ साली जंगलविषयक धोरणाची भारत सरकारने प्रथम आखणी केली. जंगलविषयक कायदा करून सर्व जंगले हे राष्ट्रीय संपत्ती असल्यामुळे तेथे राहणाऱ्या आदिवासी रहिवाशांना कायद्याच्या चाकोरीत राहूनच जंगलाचा उपयोग घ्यावा लागेल असे जाहिर केले. जंगलविषयक धोरण व कायदा अंमलात येण्यापूर्वी आदिवासींना सर्व जंगलाचा मुक्तपणे उपभोग घेता येत असे. झाडांमध्ये,पशूंमध्ये व पक्ष्यांमध्ये त्यांनी आपले दैवते स्थापन केली. जंगलविषयी नवीन कायदा झाल्याबरोबर जंगलाबाहेरचे अनेक लोक मोठ्या प्रमाणात या कायद्याच्या व धोरणाचा अंमलबजावणीसाठी जंगलात आले. तेथूनच जंगलखाते व आदिवासी यांच्यातील मानसिक संघर्ष सुरु झाला. सन १८९४ च्या जंगलविषयाच्या सरकारी धोरणाच्या अंमलबजावणीसाठी जंगलाचे प्रकार ठरविण्यात आले होते. १. हवामान किंवा भौगोलिक दृष्टीने आवश्यक अशी जंगले. २. व्यापारासाठी किमती लाकूड उपलब्ध होईल, अशी जंगले, ३. किरकोळ वस्तू निर्माण करणारी जंगले. ४, जनावरांना चारा पुरवठा करणारी जंगले, पूर्वी आदिवासी कोठेही जंगल तोडून फेरपाळीने शेती करीत असे. सन १८९४ च्या जंगलविषयक धोरणामुळे कोठेही जंगल तोडून शेती करण्यावर बंधने आली.

जंगलात कोठे कशा प्रकारे शेती करता येईल या बाबतीत नियम करण्यात आले हे धोरण ५७-५८ वर्षे चालेल. या कालावधीत जंगलात संरक्षण करण्यासाठी जो कायदा व जे नियम करण्यात आले होते त्याची अंमलबजावणी ज्या तऱ्हेने केली गेली त्यामुळे आदिवासींच्या मनात जंगलचे अधिकारी व जंगलाचा कायदा याबाबत संशय निर्माण झाले. भारत सरकारने मागील सर्व अनुभव लक्षात घेऊन १२ मे १९५२ रोजी जंगल विषयीचे धोरण नव्याने घोषित केले. जंगलविषयक नवीन राष्ट्रीय धोरण जाहीर करीत असताना इ.स.१८९४ चे धोरण थोड्या सुधारणेनेसह पुढे चालु ठेवीत आहोत असे सरकारने जाहीर केले. परंतु ही वस्तुस्थिती खरी नव्हती. आदिवासींच्या जीवनाच्या दृष्टीने हे नवीन धोरण त्यांना अत्यंत जाचक ठरले त्यात प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होता. १. जंगल ही राष्ट्रीय संपत्ती असल्यामुळे जंगल वस्तुंचा वापर करण्यावर स्थानिक लोकांच्या हक्कांवर निर्बंध आले. २. शेतीकरिता जंगलातील जमीन तयार करण्याचा त्यांचा हक्क काढून घेतला गेला. ३. दैनंदिन जीवनाला लागणाऱ्या जंगलातील वस्तूंच्या वापरांवर बंधन आली. ४. गुरे चारण्याकरिता फी आकारण्यात आली. ५. फेर पाळीने जंगल तोडून शेती करणाऱ्या आदिवासींना जंगलाचे महत्त्व पटवून देऊन त्यांनी अशी शेती करु नये याबद्दल त्यांचे मत वळविण्यात यावे व त्यांच्यावर जबरदस्ती करण्यात येऊ नये,

भारत सरकारच्या या नवीन धोरणाने जंगलाचा राजा असणारा आदिवासी जंगल खात्याची प्रजा झाली आदिवासींचे परंपरागत हक्क नाहीसे झाले. नवीन धोरणामुळे जंगलखात्याच्या अधिकाऱ्यांना अमर्याद अधिकार दिले गेले. अनेक ठिकाणी आदिवासींना जंगल खात्याच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या मालकी जमिनीत शेती करण्यासही मनाई करून ती जमिन जंगलात समाविष्ट केली. थोडक्यात इ.स. १९५२ च्या राष्ट्रीय वनधोरणानुसार आदिवासींना मिळणर्या सवलती आणखीनच कमी करण्यात आल्या. कसण्यासाठी जंगलातील पडिकच3मं जमिनी सरकारने काढून घेतल्या. राखीव जंगलाचा वापर परवान्याशिवाय आदिवासांना करता येत नाही. आदिवासींच्या पाहणीसाठी नेमलेल्या ढेबर कमिशनने त्यांच्या अहवालात यासंबंधी मोठी मार्मिक नोंद केलेली आहे. या नवीन धोरणाचा महत्त्वाचा परिणाम म्हणजे सरकारच्या तिजोरीत जास्त पैसा कसा जमा होईल याची काळजी जंगल खात्याच्या अधिकाऱ्यांना वाटु लागली.

जंगलाची कामे करण्याची जबाबदारी जंगल मक्तेदारास मिळू लागल्या. जंगल निवासी आदिवासी जंगलाचा राजा पिळला जाऊ लागाला. आपल्या झोपडीत बसून बांबू काम करणाऱ्या आदिवासीला बांबूसाठी खूप पैसे द्यावे लागले. वनात राहणारा आदिवासी हा आपल्या सारखाच एक माणूस आहे. हजारो वर्ष तो या वनात वनवास भोगत आहे. इतरांबरोबर त्याचाही आता विकास व्हावयास हवा ही विचारधारणा नव्या वनधोरणातून दिसत नाही. सागाच्या झाडाच्या जोपासनेसाठी शासन लाखो रुपये खर्च करते कारण सागाची झाडे ही राष्ट्रीय संपत्ती समजली जात नाही. त्याच्या झोपडीकडे ढुंकूनही बघत नाही . शासनाच्या दृष्टीने सागाचे झाड महत्त्वाचे आहे हा उपडा -नागडा, भुकेलेला, डोळे खोल गेलेला आदिवासी माणूस मात्र महत्त्वाचा नाही. राष्ट्रीय वनधोरणाचा मुख्य गाभा झाडाच्या विकासाबरोबर झाडाच्या सोबतीला राहणाऱ्या आदिवासींचा विकास असा ठेवण्याची गरज होती. कारण कितीही शास्त्रशुद्ध वननिती ठेवली तरी तो स्थानिकच आदिवासींच्या सक्रिय पाठिंब्या शिवाय व सहकार्याशिवाय यशस्वी होणार नाहीत. थोडक्यात रानावनात राहणारा आदिवासी समाज आणि नवे यांचे संबंध एकमेकात पुरक तसेच अतूट आहेत. दोघांच्या विकासाचा मेळ राहिला नाही तर वनाचे संरक्षण होणार नाहीच पण त्यातून सामाजिक न्याय ही प्रस्थापित होणार नाही. जंगल कायद्याने आदिवासींच्या जीवनावर दूरगामी परिणाम करणारी बाब म्हणजे पैशाच्या अर्थव्यवस्थेचा जन्म होय. आदिवासींचे कल्याण व वनसंपत्तीचे संवर्धन या बाबतीत शासनांवर मोठी जबाबदारी आहे. घटनात्मक तरतूदींनी आदिवासींना काही विशेष संरक्षण दिले आहे. वनसंवर्धनासाठी, संरक्षणासाठी, व वनसंपत्तीसाठी मेहनत घेण्याची श्रद्धा आदिवासींमध्ये निर्माण झाली तर त्याचा फायदा आर्थिक विकासाकरिता चांगलाच होईल. हजारो वर्षांपासून जंगलाच संवर्धन व संरक्षण करणाऱ्या आदिवासींच्या विकासाचा विचार करून शासनाने त्यांच्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्यासाठी वनाधिरित उद्योग प्रकल्प उभारून आदिवासींचे जीवन सुखी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ठाणे जिल्ह्यात (पालघर) सावरा, पांगारा या सारख्या मऊ लाकडाची पैदास बरीच होते. ही लाकडे निरुपयोगी म्हणून वापरली जात नाहीत. ह्या झाडांपासून कागदांचा लगदा, फ्लॅशचे दरवाजे उत्तम प्रकारे करता येतात. त्याशिवाय महाराष्ट्रातील सर्व जंगल विभागात सिसम, खैराची पैदास होते, त्यापासून कात तयार केला जातो. आधुनिक यंत्रसामुग्रीच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर काताचे उत्पादन वाढविता येईल. महाराष्ट्रामध्ये हिरडा, शिकेकाई, बेहडा, आवळा, कात यांचे मुबलक उत्पादन निघते. यावर वनाधारित उद्योगधंदे काढले तर त्यातून आदिवासींच्या रोजगारांचा आणि बेकारीचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने फायदा होईल.

जंगल संपत्तीचा विकास व संरक्षण आदिवासी करतात, त्यामुळे त्यांचा रास्त हिस्सा आदिवासींना मिळाला पाहिजे. आणखी एक गोष्ट या बाबतीत लक्षात ठेवण्यासारखी आहे, जंगल हा त्यांच्या आर्थिक जीवनाचा आधार आहे. शतकानुशतके या जंगलांनीच त्यांना जगविले आहे. शिकारीपासून कंदमुळ्यांपर्यंत, लाकूड फाट्यापासून जंगल जीवनातला आनंद लुटण्यापर्यंत साऱ्या बाबतीत त्यांनी या जंगलाचा शेकडो अनिर्बंध उपयोग करुन घेतला आहे. त्यामुळे जंगलाला ते आपली आईच मानतात. ब्रिटिश राजवट परकीय असल्यामुळे या गोष्टींचा फारसा त्यांनी विचार केला नाही हे खरे आहे. राष्ट्राच्या संपत्तीत भर चालण्यासाठी जंगलाची वाढ करण्याच्या योजना आखताना आदिवासींच्या मानसशास्त्राचा पण विचार केला पाहिजे, ही सर्व परिस्थिती विचारात घेतली असता जंगल व आदिवासी दोघेही सुखासमाधानाने राहून राष्ट्रीय हित कसे साधले जाईल हे पाहिले पाहिजे, आज जंगल विभागाचे काम जंगलखाते करीत आहे. आदिवासी लोकांच्या आर्थिक विकासाची जबाबदारी जंगलखात्यावर सोपविली पाहिजे. जंगलात राहणाऱ्या आदिवासीला १२ महिने मजुरी पुरविण्याची योजना जंगल खात्यावर सोपविले तर जंगलाचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. आदिवासी सुखी होईल व परस्परांचे आमचे जे संबंध विरोधी झाले आहेत त्यांचा समन्वय होईल. इतर जंगल माड तेंडूपत्ता, डिंक, चारोळी, मध, गवत निरनिराळया सालीवज वगैरे खरेदी विक्रीत दलालांचा वर्ग पुढे आलेला आहे. आज सहकारी विकास महामंडळाकडे सोपवून महामंडळामार्फत ही खरेदी विक्री व्हावी, जंगल संवर्धन व संरक्षणाबाबतची जबाबदारी अधिकाधिक स्थानिक आदिवासी तरुणांवर सोपविली पाहिजे. ज्या ठिकाणी आदिवासी पिढ्यान् पिढ्या राहात आहेत त्यांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास होणे गरजेचे आहे.

ब्रिटिशांच्या काळात आदिवासींनी आर्थिक संघर्षातून चळवळ केलेली दिसते. या चळवळी जंगलाच्या प्रश्नांवर केंद्रिभूत झाल्या होत्या. भारतातील जरो अनेक आदिवासींचा स्थिर शेती हा व्यवसाय असला तरी जंगल उत्पादने हा आदिवासींच्या उदरनिर्वाहाचा जोड व्यवसाय बनला होता. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जे जंगलाचे धोरण जाहीर केले त्यामुळे अनेक शतक जंगलावर अवलंबून राहणाऱ्या जंगलांना वस्तीस्थान बनविणाऱ्या आदिवासींसमोर संकट उभे राहिले. ब्रिटिशांनी जंगलविषयक नवीन कायदे केले. या कायद्यामुळे सरपण, मध, लाख, डिंक, औषधी वनस्पती वगैरे गोळा करणे, शिकार करणे, दारु गाळणे इ. गोष्टींवर निर्बंध येऊन त्यांच्या उत्पन्नाच्या मार्गात बंधने आली.

संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात आदिवासींचे जंगलावरचे अवलंबन स्पष्ट करताना म्हटले आहे की आदिवासी हे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे त्यांच्या जीवन-निर्वाह विषयक गरजांचे निराकरण जंगलाकडूनच करतात. मुळातच आदिवासी जमाती प्रगतांपासून दूर अशा रानावनात, जंगलात राहतात. यामुळेच काही आदिवासींना वन्य जमाती असेही म्हणतात, त्यांचे अन्न जंगलाकडूनच मिळते. जंगलात राहणारे पशु-पक्षी, जंगलातील खाण्यायोग्य वनस्पती कंदमुळे, फळे, मध, फळबिया वगैरे कसे प्राप्त करावे याचे आदिवासींच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून शिक्षण दिले जाते. पिण्यासाठी पाणी देखील त्यांना वाहत्या झऱ्याचे मिळते. पाने, पशूंची कातडी, तंतृयुक्त वनस्पती इ. वापर अंगावरच्या वस्त्रांसाठी, निवासासाठी गुहा, जंगलातील लाकूड वगैरेचाच वापर केला जातो. प्रतिबंधात्मक व उपचारात्मक अशा दोन्ही प्रकारच्या विविध औषधांची देणगी जंगलाकडूनच आदिवासींना मिळाली आहे. इंधनासाठी तर जंगलातील वाळलेली, पडलेली लाकडे ते वापरतात. तर काही या जंगलसंपत्तीचा बांबू, हाडे वगैर शेजारील प्रगतांना विकून चार पैसे वा प्रगतांकडून काही जीवनावश्यक वस्तू घेतात. आदिवासींचे निसर्गाशी तादात्म्य पावून जगणे हे शतकानुशतके चालत आले आहे हे वरील चर्चेतून व त्यांच्या विविध आर्थिक क्रियांतून दिसून येते.

मानवाचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक वगैरे जीवनावर भोवतालच्या परिस्थितीचा फार मोठा प्रभाव पडत असतो. त्यातून आदिवासी जमाती या विज्ञान व तंत्रज्ञानाचा अभाव असलेल्या अनेक अंधश्रद्धा, अवैज्ञानिक समजुती अंगवळणी पडलेल्या आहेत. विशेषत: आपण जेव्हा त्यांच्या आर्थिक जीवनाचा विचार करतो तेव्हा त्यांच्या भोवताली असलेल्या नैसर्गिक पर्यावरणाचा त्यावर खोलवर प्रभाव पडल्याचे दिसते. दीर्घकाळ प्रगत समाज, शासनव्यवस्था, कायदे यांपासून दूर राहिलेल्या आदिवासी जमाती या जंगल व नैसर्गिक पर्यावरणाशी एकत्रित झालेल्या आहेत. मुळातच अनेक बाबतीत मुक्त असलेल्या या जमातींचा जंगलाशी अत्यंत निकटचा संबंध निर्माण झाला होता. एवढेच नव्हे तर 'जंगलाचे राजे' अशीच भावना त्यांच्या वृत्तीत व कृतीत दिसून येते. वारली जमातीत तर असे म्हटले जाते की 'बामनाच्या जन्माला जाशील तर लिक्खू- लिक्खू (लिहून लिहून) मरशील.

निसर्गातील घटकांपाठीमागची कारण मीमांसा आदिवासींना माहित नसली तरी निसर्गावरच त्यांचे कल्याण- अकल्याण अवलंबून आहे याची त्याला सतत जाणीव असते. निसर्ग अनुकूल असेल, पाऊस पडतो, पिके येतात, रोगराई येत नाही, पण तो जर कोपला,

अवर्षण किंवा अतिवर्षण होते, वादळ, तुफान, भूकंप, पुर, वणवा यांसारख्या हानिकारक गोष्टी होतात. मानवी जीवन उद्ध्वस्त होते. यामुळेच त्याच्या मनात निसर्गाबद्दल आदर निर्माण झाला. वृक्ष, नदी, सूर्य, चंद्र, पृथ्वी, पाऊस, वादळ, इ.. देव मानून त्यांची पूजा आदिवासी करु लागला. आदिवासींच्या सामाजिक चालीरीती, धार्मिक श्रद्धा, जादूटोणा, अनेक परंपरा, सण-उत्सव इत्यादींचा प्रभाव दिसतो. म्हणजे त्यांचे एकूण जीवन निसर्गाधीन आहे असेम9 स्पष्टपणे जाणवते.ते त्यांच्या कुलप्रथांमध्ये काही वनस्पती, पशु-पक्षी, फूले यांना पूर्वज मानले जाते. त्यांच्या देवदेवता भूतप्रेत यांच्यावरही पर्यावरणाचा परिणाम स्पष्टपणे जाणवतो. सण-उत्सव, जन्म-मृत्यु, विवाह वैगरेत भोवतालच्या निसर्गाचा परिणाम स्पष्टपणे जाणवतो.निसर्गाचा कोप होऊ नये म्हणून काही निसर्गशक्तींना देवतेचे रूप दिले जाऊन त्यांची आळवणी केली जाते. त्यांच्या गीतांतून त्यांचे निसर्गावरचे अवलंबन स्पष्टपणे दिसून येते. सामूहिक नृत्यातून एकीकडे आनंद घेताना निसर्गातील पशू-पक्ष्यांच्या डोक्याचे मुखवटे लावून ते नृत्यात सहभागी होतात. त्यांची वारली चित्रकला, विणकाम, दंत कथातून चालत आलेले साहित्य यातून निसर्गातील विविध बाबींशी त्यांचे संबंध स्पष्ट होतात. त्यांच्या म्हणी, वाक्प्रचार, समूहगीते, लोक कथा इ. त्यांच्यावर भोवतालच्या निसर्गाचा खोलवर पडलेला प्रभाव आवळती. निसर्गाकडून त्यांना खाद्यान्न मिळते. या बदल्यात ती निसर्गाबद्दल विविध स्वरुपात कृतज्ञता व्यक्त करतो. जंगलात मोठ्या प्रमाणात विशिष्ट प्रकारची फुले. मादक वनस्पती मिळतात. त्यापासून आदिवासी समाज दारु गाळण्याचे काम करतो.

शिकार, मासेमारी, शेती यशस्वी होण्यासाठी जादूटोण्याचे सहाय्य येतो. मंत्रतंत्राचा वापर करून ही दिला जातो. सभोवतालचे निसर्गातील धोके, हिंस्र पशूंचे हल्ले वगैरेपासून आपल्या पशूचे संरक्षण व्हावे यासाठीही काही धार्मिक देवतांची पूजा केली जाते. या जमातीला प्रगतांप्रमाणे वाचन लेखन, गणितशास्त्राचे औपचारिक शिक्षण मिळत नसेल पण निसर्गाकडून त्यांचे सामाजिक व आर्थिक जीवनासाठी उपयुक्त शिक्षण मिळते. जमिनीवरच्या पाऊलखुणा कोणत्या पशूच्या आहेत. आवाज कोणत्या पक्ष्यांचा आहे, कोणते प्राणी-किटक विषारी व बिनविषारी आहेत, याचे त्याला पुरेपुर ज्ञान झाले असते. जंगलातील वृक्ष रोपे, फळे फुले, पशु-पक्षी यांच्याकडे ते भावनिकदृष्ट्या पाहतात. ते आपले पूर्वज आहेत अशी त्यांची तीव्र श्रद्धा असते. त्यांना ते अत्यंत प्रिय, पवित्र वाटतात, त्यांची ते पूजा करतात. घरावर, युवागृहावर त्यांची ते चित्रे काढतात. त्यांचा कोणत्याही प्रकारे अपमान त्यांना आवडत नाही. एकूण त्यांच्या समाज जीवनाची व व्यक्तिमत्त्वाची जडणघडण निसर्गाशी संबंधित असते. बेल, पिंपळ व उंबर ही झाडे पवित्र मानून त्यांची पूजा केली जाते. म्हणून झाडांच्या लाकडाचा जळण म्हणून कधीच उपयोग करीत नाही. निसर्ग देवतेची पूजा करणे हा वारल्यांच्या धर्माचा एक विशेष भाग आहे. वाघ्या नारन् देव, हिरवा, हिमाई देवाला ते मोठ्या प्रमाणात मानतात. आजारपण, संकटे ही देवाच्या कोपामुळे प्राप्त होतात अशी वारली लोकांची समजूत आहे. २१ व्या शतकात या समाजाच्या राहणीमानात खूपच बदल झाला आहे. असे असले तरीसुद्धा स्वातंत्र्यकाळातही या समाजासमोर मोठ्या प्रमाणात आर्थिक समस्या आहे. संपूर्ण देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी समाजाचा एखादा भाग अविकसित राहता कामा नये. आदिवासी लोकांमध्ये अर्थव्यवहार विषयक अज्ञान व आगतिकता दिसून येते. असे असले तरी जगातला राजकारण समजून घेण्याची त्यांची जिज्ञासा वाढली आहे. 'मला माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे' असा विश्वास त्यांच्यात निर्माण झाला आहे. 'माझी लूट होत आहे' हे शल्य त्याला बोचू लागले आहे. या समाजामुळे आपली वनसंपत्ती व पर्यावरण समतोल राखण्यास मोठ्या प्रमाणात मदत होत आहे. याची जाणीव शासनाबरोबर सुशिक्षित समाजाने पण ठेवली पाहिजे. या समाजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून तो जगासमोर मांडला पाहिजे. आपल्या जीवनातील अविभाज्य घटक हा समाज आहे याचे भान ठेवली पाहिजे.

**संदर्भसुची**

१) आम्ही आदिवासी वारली - अंधेर महादेव

२) महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न- डॉ. फड़के सुधीर

३) महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी जमाती - डॉ. गारे गोविंद

४) वारली लोकगाथा - नम बाळु

५) वारली - सावे खंडेराव

६) वारली हृदय - ठाणकर संपद

७) वारली चित्र संस्कृती - डॉ.गारे गोविंद

८) वर्तमानपत्रे 'सामना', 'लोकसत्ता'

९) इंटरनेट, यूट्यूब वरुन माहिती मिलवली

१०) क्षेत्र भेटीतून प्रत्यक्ष माहिती मिळवली.

११) M.Phil प्रबंध मधून माहिती( डॉ. हेमलता मुकणे)

२) P.hd प्रबंध मधून माहिती (डॉ. हेमलता मुकणे)